# शंभर रूपयांच्या बॉण्डवर कंकालेश्वरची जमीन विकणाऱ्यावर होणार गुन्हा दाखल?

## धमकी देणारा कोण? जमीन विकून नामानिराळा आता तहसीलदारसमोर बोलू लागला

## २३ तारखेला ठरणार अतिक्रमणावर बुलडोजर की कारवाई

बीड (सरकार): जगप्रसिध्द कंकालेश्वर मंदिराची ५१ एकर जमीन असून बोटारवर मोजण्या इतकी जमीन शिल्लक राहीली आहे. आपल्या बापजादाची जमीन असल्यासारखे शंभर रूपयांच्या बॉण्डवर जमिनीची प्लॉटींग करून जमीनी विकल्या गेल्या आहेत. जमिनी विकून दादागिरी करून मारहाणीची भाष्य करणारे तहसीलदारसमोर जोरजोराने बोलू लागले आहेत. मात्र अशा मंदीराच्या जमीनी विकणाऱ्या आणि त्यातून लाखो रूपये कमाविणारे आता २३ तारखेला अडकणार आहेत. तहसीलदार कारवाई करणार, गुन्हा दाखल करून बुलडोजर फिरविणार का? याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

बीड येथील कंकालेश्वर मंदिराच्या ५१ एकर जमिनीवर अतिक्रमण करण्यात आले आहे. आपल्या मर्जीप्रमाणे , दादागिरी, गुंडगिरी करून १०० रूपयांच्या बॉण्डवर विक्री केल्या. जमिनीची प्लॉटींग पाडून कोटयावधी रूपये कमावले आणि आता हे पाप डोक्याच्या वर गेल्याने परतफेड करण्याची वेळ आली आहे. जुन्या काळी अनेकजण म्हणायचे की , देवाची कोणतीही वस्तु घ्यायची नसते, खायची नसते . मात्र येथे तर देवस्थानची जमीन लुटून खाल्ली आणि आता दादा गिरीची भाषा करू लागले आहेत. मात्र अति तेथे माती असते. देवस्थानच्या जमिनी विकणाऱ्यांनो तुमच्या पापाचा घडा भरला आहे. येथील जमिनीवर झालेले अतिक्रमण आता बुलडोजरने विकण्याची वेळ आली असल्याची प्रशासनात चर्चा आहे. मात्र ज्यांनी जमिनी घेतल्या त्यांचे पैसे देणार कोण? त्यामुळे ज्यांनी पैसे दिले ते आता देवस्थानच्या जमिनी विकणाऱ्यांच्या मागे लागले आहेत. आमचे पैसे द्या. आम्हाला तुमचा प्लॉट नको, जमिनी नको त्यामुळे आता या जमिनी विकणाऱ्यांची पळती भुई थोडी झाली आहे. त्यामुळे येणाऱ्या २३ तारखेला तहसीलदार काय फैसला घेतात, बुलडोजर फिरवरवून अतिक्रमण हाटवून शंभर रूपयांच्या बॉण्डवर जमिनी विकणाऱ्यांवर गुन्हा दाखल होणार का? याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.




सायं.दैनिक बीड ■ E-mail : beedsarkar @ Gmail.com ■ किंमत: १ रू. ■ पाने : ४

# सरकार

संपादक-आदोडे साहस

Evening Daily beedsarkar





बीड महाराष्ट्र ■ वर्ष १२ वे ■ अंक २१४ वा ■ सोमवार २१ एप्रिल २०२५ ■ RNI NO. MAHMAR/2012/49908 पोस्टल दिनांक २२ एप्रिल २०२५ पाने ४ किंमत १ रू.

Beed MAHARASHTRA ■ Year 12 Issu 214 ■ Monday 21 April 2025 ■ RNI NO. MAHMAR/2012/49908 ■ पोस्टल क्रं.No.L/SB/Beed/RNP-248/2025-2027


# माजलगावात बिलावरून हॉटेल मालकाचा खून

## आठडभरात दुसरी घटना ; पोलिसांचा नाकर्तेपणा उघड

**शेख मुजफ्फर । माजलगाव**

माजलगाव शहर आठवडाभरात झालेल्या दुसर्या खुनामुळे अक्षरशः हादरून गेले आहे. दरम्यान, कायदा सुव्यवस्था धाब्यावर बसल्याने पोलिसांचा नाकर्तेपणा पुन्हा सिद्ध झाला आहे. भाजपा पदाधिकाऱ्याच्या पाठोपाठ हॉटेल मालकाच्या खुनामुळे माजलगाव शहर आणि परिसरात खळबळ उडाली आहे.

माजलगाव शहरापासून ४ किमी अंतरावर नागडगाव पाटी कॉनर्रवरील गावरान ढाबा मालक महादेव गायकवाड (वय ५४) रा.मंजरथ रोड माजलगाव यांच्या रविवारी रात्री साडेसात वाजेच्या सुमारास ढाब्यावर बसलेल्या माजलगाव तालुक्यातील आनंदगाव येथील ग्राहकांनी बिलाच्या कारणाने डोक्यावर वार करून प्राणघातक हल्ला केल्याची घटना घडली. या हल्लयात ढाबा मालक महादेव गायकवाड व मुलगा आशुतोष महादेव गायकवाड गंभीर जखमी झाले होते. महादेव गायकवाड यांना छत्रपती संभाजीनगर येथे उपचाराठी हलवण्यात आले होते. मात्र उपचारादरम्यान त्यांचे प्राणज्योत मालवली. तर मुलगा आशुतोष महादेव गायकवाड याच्यावर उपचार सुरू असून माजलगाव ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.





पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बीडच्या माजलगावमध्ये एका हॉटेलमध्ये देण्याच्या क्षुल्लक कारणावरून ग्राहकांकडून हॉटेल मालक महादेव गायकवाड आणि त्यांच्या मुलाला बेदम मारहाण करण्यात आली. मारहाणीमध्ये गंभीर जखमी झालेल्या हॉटेल मालक महादेव गायकवाड यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. माजलगाव मार्गावर असलेल्या नागडगाव फाटा कॉर्नरवर महादेव गायकवाड यांचा गावरान ढाबा आहे. या ढाब्यावर संध्याकाळी सातच्या सुमारास रोहित शिवाजीराव थावरे आपल्या मित्रांसोबत आला होता. यावेळी रोहितचा हॉटेल मालक महादेव गायकवाड आणि त्यांच्या मुलासोबत बिलाच्या कारणावरून वाद झाला. हा वाद इतका विकोपाला गेला की रोहित आणि त्याच्या मित्रांनी महादेव गायकवाड यांच्या डोक्यावर धारधार शस्त्राने वार केले. त्याचसोबत महादेव यांच्या मुलावर देखील प्राणघातक हल्ला करण्यात आला. या हल्लयामध्ये महादेव आणि त्यांचा मुलगा गंभीर जखमी झाला. गंभीर जखमी महादेव यांना बीडमध्ये प्राथमिक उपचार करून छत्रपती संभाजीनगर येथे हलवण्यात आले. त्याठिकाणी त्यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. तर त्यांच्या मुलावर उपचार सुरू आहेत. या धक्कादायक प्रकरणाने बीड जिल्हा हादरला आहे. उपचारादरम्यान मालकाचा मृत्यू झाल्याने गायकवाड कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. आरोपींना लवकरात लवकर अटक करण्याची मागणी नातेवाईकांनी केली आहे. पोलीस आरोपींना कधी पकडतात याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे.

## कड्यात व्यापाऱ्याचे घर फोडले

आष्टी (सरकार): तालुक्यातील कडा येथे अज्ञात चोरटयांनी (दि.२०) रविवार रोजी मध्यरात्री घराचा दरवाजा तोडून सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा एकूण २,३२,००० हजारांचा मुद्देमाल लंपास केल्याची घटना घडली असून चोरट्यांविरुद्ध आष्टी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जिल्हाभरात मागील काही दिवसांपासून चोरीच्या घटनेत वाढ होताना दिसत आहे.अश्यातच आष्टी तालुक्यातील कडा आडत व्यायवसायिक दिलीप नेनसुखलाल बलदोडा (वय ५२) यांच्या घराचा दरवाजा अज्ञात चोरटयांनी (दि.२०) रविवार रोजी मध्यरात्री तोडून घरातील १० ग्रॅमचे सोन्याचे मणी मंगळसूत्र अंदाजे किंमत ४०,००० रुपये , तीन ग्रॅमची अंगठी अंदाजे किंमत १२००० रुपये , २० ग्रॅमचे सोन्याचे ब्रासलेट अंदाजे किंमत ८०००० रुपये व रोख रक्कम १,००,००० रुपये असा एकूण २,३२,००० हजारांचा मुद्देमाल चोरट्यांनी लंपास केला असून पुढील तपास पोलीस करत आहे.

## परळी नगर पालिकेतील त्या ठेकेदाराला आवर घाला

### पाणी पुरवठा विभागात भ्रष्टाचाराचा कळस | पाईपलाईन,मोटार खराब दाखवून दुरूस्ती व नवीन टाकण्यात लाखो रूपयांचे बिल काढले जातात

बीड (सरकार): परळी नगर पालिकेच्या पाणी पुरवठा विभागात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचाराचा कळस गाठला आहे. शहरामध्ये पाईपलाईन, बोअरवेल्स मोटार, खराब झाल्याचे दाखवून नवे टाकणे, दुरूस्ती करणो चांगले पाईप भंगारमध्ये टाकून कर्मचाऱ्यांना हाताशी धरून मोठ्या प्रमाणात बिले काढण्याचे षडयंत्र परळी नगर पालिकेत केले जात आहे. त्यामुळे नगर पालिकेतील त्या गुत्तेदाराच्या सर्व बिलाची चौकशी करावी आणि आतापर्यंत टाकलेले पाईप आयएसआय ट्रेड आहे का , असेल तर कोणत्या कंपनीचे, जुने कोठे गेले या सर्व गोष्टीची तपासणी करावी अशी चर्चा होत आहे.


परळी शहरात विविध भागात नागरीकांना सुविधा देण्यासाठी परळी नगर पालिका कटिबद्ध असून या संकल्पनेला पाणी पुरवठा विभागातून आव्हान देण्यात आले आहे. शहरातून जाणारे पाईप लाईन खराब झाल्याने काढून टाकणे, नवे बसविणे, चांगले पाईप भंगारमध्ये टाकणे, बोअरवेल्सची मोटार खराब झाली नसली तरी तीच बसविण्याचे मोठे षढयंत्र दिसून येत आहे. गंभीर बाब म्हणजे खराब झालेल्या वस्तू जातात कोठे? नव्या आणलेल्या वस्तु नगर पालिकेच्या कोणत्या अधिकाऱ्याला दाखविल्या जातात. हा अधिकारी मुख संमती देतो कसा? या सगळ्या गोष्टीमुळे अधिकारी, कर्मचाऱ्यांना हाताशी धरून हा ठेकेदार राजरोजपणे नगर पालिका व परळीकरांच्या डोळ्यात धुळ फेकून महिन्याला, वर्षाला लाखो रूपये दुरूस्ती आणि नवीन बसविलेल्या वस्तुंची बिले काढण्याचा सपाटा सुरू ठेवला आहे. त्यामुळे आधीच पाणीटंचाईच्या त्रासाने त्रस्त झालेल्या नागरीकांत संतापाची लाट उसळली असून सदरील या ठेकेदाराचे तातडीने टेंडर रद्दकरून पाणी पुरवठा विभागाने केलेल्या कामाची चौकशी करावी आणि झोपेचे सोंग घेऊन बसलेल्या कक्ष अधिकारी पाणी पुरवठा विभागातील अधिकारी, इंजिनिअर यांना जागे करावे आणि या ठेकेदारावर कारवाई करावी अशी चर्चा होत आहे.

## बडतर्फ कासलेचा अजून एक कारनामा उघड

### सहा लाख रुपयांची फसवणूक केल्याने अंबाजोगाईत दुसरा गुन्हा दाखल

अंबाजोगाई (सरकार): विविध पोलिस अधिकारी आणि राजकीय नेते यांच्यावर गंभीर आरोपांची राळ उठवून वादग्रस्त ठरलेल्या बडतर्फ पीएसआय रणजीत कासलेचा आणखी एक कारनामा समोर आला आहे. कासले याने मैत्रीचा गैरफायदा घेत तब्बल सहा लाख रुपयांची फसवणूक केल्याचा आरोप अंबाजोगाई येथील व्यावसायिक सुधीर छगनराव चौधरी यांनी केला आहे. याप्रकरणी अंबाजोगाई शहर ठाण्यात कासले याच्यावर फसवणुकीचा गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

सुधीर चौधरी हे अंबाजोगाई येथे कुणाल इंटरप्रायजेस नावाने एनर्जी ड्रिंकची एजन्सी चालवतात. चौधरी यांच्या तक्रारीनुसार, एप्रिल २०२४मध्ये कासले याने आईची प्रकृती खालावल्याचा बनाव रचून चौधरी यांच्याकडून प्रथम विविध फोन पे नंबरवरून एक लाख रुपये घेतले. यानंतर १५ एप्रिल रोजी दवाखान्याच्या खर्चासाठी रोख रक्कम लागल्याचे सांगून रेस्ट हाऊस, अंबाजोगाई येथे भेट घेऊन पाच लाख रुपये कॅश स्वरुपात घेतले. हे पैसे चौधरी यांनी आपल्या वडिलांच्या खात्यातून काढून दिले होते. त्यानंतर अनेकदा मागणी करूनही कासले याने पैसे परत केले नाहीत. माझी गाडी खासगी सावकाराकडे ठेवून मला व्याजावर पैसे मिळवून दे आणि आपला व्यवहार



संपवू, असा सल्ला देत त्याने फसवणुकीची परिसीमा गाठली. त्यानंतरही त्याने प्लॉट विकून पैसे देतो, असा पुन्हा वेळकाढूपणा केला. अखेर चौधरी यांनी अंबाजोगाई शहर ठाण्यात कासलेच्या विरोधात तक्रार दिली. बडतर्फ पोलिस उपनिरीक्षक रणजीत कासले हे स्वतःच्या खात्यावर दहा लाख रुपये धनंजय मुंडे यांच्या माणसांनी पाठवले, असे सांगत होते.

## उद्धव ठाकरेंच्या'प्रतिसाद'नंतर राज ठाकरेंकडून मनसेच्या नेत्यांना सूचना

मुंबई (सरकार): मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी ठाकरे गटाचे प्रमुख आणि माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना एकत्र येण्याची साद घातली. यानंतर उद्धव ठाकरेंनी देखील प्रतिसाद दिला.



यानंतर गेल्या दोन दिवसांपासून राज ठाकरे आणि उद्धव ठाकरेंच्या एकत्र येण्यावरुन विविध राजकीय चर्चा सुरु आहे. राज्यातील विविध पक्षातील नेत्यांनी देखील ठाकरे बंधू एकत्र येण्याच्या चर्चांवर प्रतिक्रिया दिली आहे. ठाकरे बंधू एकत्र आले तर आनंदच आहे, असं अनेकजण बोलताना दिसले. मात्र आता राज ठाकरेंनी मनसेच्या नेत्यांना सूचना दिल्या आहेत. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्या युतीच्या प्रश्नाबाबत २९ तारखेपर्यंत बोलू नका, अशा सूचना राज ठाकरेंकडून देण्यात आल्या आहेत. मनसेचे ज्येष्ठ नेते प्रकाश महाजन यांनी याबाबत एबीपी माझाला माहिती दिली. राज ठाकरे सध्या परदेशात आहेत. त्यामुळे मनसे आणि शिवसेना ठाकरे गटाच्या युतीचा विषय संवेदनशील आहे. त्यामुळे २९ एप्रिलपर्यंत कोणीही बोलू नका, अशा सूचना राज ठाकरेंकडून मनसेच्या नेत्यांना देण्यात आल्या आहेत.

## महिलांनो रिक्षात बसल्यास पुरूष प्रवाशाचे फोटो काढा

### अजित पवारांनी महिलांना दिला सल्ला

पुणे (सरकार): उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते पुण्यातील कृषी महाविद्यालय, शिवाजीनगर येथे आज पिंक ई-रिक्षा वाटपाचा भव्य कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमात पात्र महिलांना ६० पिंक ई-रिक्षांचे वाटप करण्यात आले. महिला व बालविकास विभागामार्फत राबवण्यात येणाऱ्या या योजनेच्या माध्यमातून पुणे जिल्ह्यात ४,००० महिलांना रिक्षा वाटपाचे उद्दिष्ट आहे.





पहिल्या टप्प्यात १,७२६ लाभार्थ्यांना मंजुरी मिळाली असून, यापैकी ६० महिलांना आज रिक्षांच्या चाव्या देण्यात आल्या. अजित पवार यांनी यावेळी बोलताना या योजनेचे सामाजिक परिवर्तनातील महत्त्व अधोरेखित केले. ही योजना महिलांना सक्षम आणि बळकट करण्यासाठी आहे. यातून रोजगाराच्या संधी निर्माण होणार असून, महिला समाजाच्या मुख्य प्रवाहात येतील. प्रवासासाठी पिंक रिक्षांचा प्राधान्याने वापर करावा, कारण त्या सुरक्षित आणि विश्वासार्ह आहेत. यावेळी त्यांनी पुरुष प्रवाशांचे फोटो काढण्याचा सल्ला देत, सुरक्षिततेसाठी हा उपाय उपयुक्त ठरेल. काही विकृत मानसिकतेचे लोक असतात, त्यांच्यापासून सावध राहण्यासाठी हे गरजेचे आहे, असाही सल्ला अजित पवार यांनी दिला. यावेळी अजित पवार यांनी लाडकी बहीण योजनेच्या यशाचाही उल्लेख केला. लाडकी बहीण योजनेला विधानसभा निवडणुकीत महिलांनी मोठा पाठिंबा दिला. ही योजना कधीही बंद होणार नाही. कुणी कितीही अफवा पसरवल्या, तरी महिलांच्या सन्मानासाठी ही योजना सुरू राहील, असे ठामपणे सांगितले.

## संपादकीय

# टेस्ला: रोजगार निर्मितीला चालना

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि टेस्लाचे मालक इलान मस्क यांच्यात काल दूर्ध्वनीवरून चर्चा झाली. या चर्चेचा सारांश भारतात टेस्लाचा प्रवेश निश्चित करण्याचा होता आणि त्या दृष्टीने दोन्ही प्रमुखांमध्ये सकारात्मक चर्चा झाली. अमेरिकन अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी जगाला टॅरिफच्या धमकीने दहशतीत ठेवले असताना भारतीय पंतप्रधान अमेरिकन उद्योगपती मस्क यांच्याशी त्यांचा टेस्ला हा उद्योग भारतात विस्तारित करण्यासंदर्भात चर्चा करतो ही निश्चितच आशादायक बाब आहे. भारत आणि अमेरिका यांच्यातील उद्योगांमध्ये व्यापक चर्चा होऊ शकते आणि या दोन्ही बाबतीत प्रचंड वाव आहे, हे मोदी आणि मस्क यांच्यातील चर्चेतून स्पष्ट झाले आहे. जरी भारताचे अमेरिकेशी टॅरिफच्या मुद्यावरून संबंध बिघडलेले असले तरीही मोदी यांच्या म्हणण्यानुसार भारत अमेरिकेशी असलेली आपली भागीदारी पुढे नेऊ इच्छितो आणि मोदी यांनी हे स्पष्ट सांगितले आहे. मोदी आणि मस्क यांच्यातील चर्चेला या अर्थाने महत्त्व आहे कारण मस्क हेच सध्याच्या ट्रम्प प्रशासनात प्रभावशाली व्यक्ती म्हणून समजले जातात. त्यामुळे त्यांच्याशी चर्चा करणे हे भारतासाठी प्रचंड लाभदायक ठरू शकते. टेस्लाचे भारतातील आगमन यामुळे निश्चित झाले आहे असे समजले जाते. भारतातील अन्य विरोधी पक्षांनी टेस्लाच्या आगमनासाठी काही वर्षांपूर्वी पायघड्या घातल्या होत्या.

पण मस्क यांनी मोदी यांना पसंती दिली यावरून मोदी यांचे अमेरिकेशी आणि ट्रम्प यांच्याशी किती जिव्हाळ्याचे संबंध आहेत ते लक्षात येते. मोदी आणि मस्क यांच्यातील चर्चेत अनेक महत्त्वाच्या मुद्यांवर चर्चा झाली असे सांगण्यात आले. पंतप्रधान मोदी यांच्या स्वायत्ता धोरणाला प्रचंड महत्त्व आहे आणि भारताने कोणत्याही बाबतीत अमेरिकेच्या किंवा कोणत्याही देशाच्या दबावाखाली येऊन निर्णय घेतला नाही हे वास्तव आहे. भारताचे कोणत्याही देशाच्या दबावाखाली न येण्याचे धोरण लक्षात घेऊन मोदी वारंवार अनेक देशांचे दौरे करत असतात, पण काल मात्र त्यांनी दूर्ध्वनीवरून चर्चा केली. इलान मस्क यांना जगातील सर्वात श्रीमंत व्यक्ती म्हणून गणले जाते. मोदी आणि मस्क यांच्यात तंत्रज्ञान आणि नावीन्यपूर्ण संशोधन यावर चर्चा झाली. ही चर्चा फलद्रूप झाली तर त्याचे परिणाम दोन्ही देशांसाठी आत्यंतिक होणार आहेत. भारताची अर्थव्यवस्था सध्या चांगल्या अवस्थेत असली तरीही तिच्यावर टॅरिफचे सावट आहे. त्यातून मार्ग काढण्यासाठी मस्क यांचा आधार भारताने शोधला तर त्यात वावगे काही नाही. टेस्लाच्या आगमनाने भारतीय बाजारपेठ उत्साहाने उचबंळून येणार आहे आणि भारतीय बाजारात नव्या गाड्यांचे आगमन होणार आहे आणि त्यामुळे सध्या जी बाजाराला विशेषतः विद्युत वाहनांच्या बाजारपेठेला मरगळ आली आहे ती जाणार आहे. त्यादृष्टीने मोदी आणि मस्क यांच्यातील चर्चेचे महत्त्व अपरंपार आहे. टेस्ला कार्स ज्या विद्युतवर चालतात त्यांच्या आगमनाची भारतात प्रचंड प्रतीक्षा आहे. त्यामुळे ही चर्चा जर खरोखरच यशस्वी झाली, तर भारतीय कार उद्योगासाठी ती क्रांती ठरेल. शिवाय मरगळलेल्या कार उद्योगासाठी टेस्लाचे आगमन ही सुखद वार्ता ठरेल, त्यादृष्टीने या चर्चेकडे सकारात्मक पद्धतीने पाहिले पाहिजे. पण त्यापेक्षा या चर्चेकडे अधिक सकारात्मक दृष्टीने पाहिले पाहिजे ते सध्याच्या अमेरिकेच्या टॅरिफच्या धोरणाच्या संदर्भात. मोदी आणि मस्क यांच्यात भारत आणि अमेरिका यांच्यातील संभाव्य सहकार्याबाबत चर्चा झाली ही अत्यंत सकारात्मक बाब आहे. त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. या चर्चेनंतर टेस्लाचे भारतातील आगमन निश्चित मानले जात आहे. त्यामुळे भारतातील बेरोजगारी कमी होण्यास मदत होणार आहे आणि अमेरिकेच्या जगभरात जो संताप व्यक्त होत आहे त्याला कुठेतरी आळा बसेल अशी दोन्ही देशांना आशा आहे. तंत्रज्ञान आणि नवोन्मेष या क्षेत्रात चर्चा झाली आणि त्यावर व्यापक सहमती होण्याची शक्यता आहे. मोदी यांच्यासारखा द्रष्टा पंतप्रधान लाभल्यामुळे देशाला कितीही मोठ्या संकटातून वाट काढून घेऊन जातो याचे हे उदाहरण आहे. या चर्चेचे फलित म्हणून या महिन्यात टेस्लाचे अधिकारी भारत दौऱ्यावर येणार आहेत. त्यात टेस्लाच्या आगामी आगमनासंबंधी तपशील निश्चित होईल. ही चर्चा त्यासाठीच होती असे सांगण्यात आले आहे. टेस्लाने भारतात तर भरती प्रक्रिया सुरू केली आहे अशीही चर्चा आहे. त्यामुळे विरोधक कितीही बोंबा मारोत किंवा भारताच्या सार्वभौमत्वासंदर्भात कितीही ओरड करोत, टेस्ला भारतात येणार आणि भारताला चांगले दिवस येणार हे निश्चित आहे, आता टेस्लाचे आगमन, तर निश्चित आहे. त्यामुळे भारतात आनंदाची लहर पसरणार आहे. कारण भारतातील विद्युत वाहनांची बाजारपेठ यामुळे प्रचंड उत्साहित झाली आहे. तसेच विद्युत वाहनांची खरेदी वाढणार आहे आणि त्यामुळे प्रदूषणाला आळा बसणार आहे. मोदी आणि मस्क यांच्यातील या चर्चेकडे या सर्व प्रकारच्या सकारात्मक दृष्टिकोनातून पाहिले पाहिजे. मोदी आणि मस्क यांच्यात चर्चा झाली ती तंत्रज्ञान आणि सहकार्यावर झाली. या दोन्ही क्षेत्रात प्रचंड सहकार्याची बीजे आहेत हे दोघांनीही ओळखले. टॅरिफच्या सावटात भारत आणि अमेरिका यांनी एक होणे गरजेचे आहे हे भारताने ओळखले आहे तितकेच ते अमेरिकेने ओळखले आहे. कारण जितकी भारताला अमेरिकेची गरज आहे तितकीच अमेरिकेलाही भारताची गरज आहे आणि मस्क यांच्याबाबतीत तर असे सांगता येईल की, त्यांच्या कंपनीसाठी भारतासारखी विशाल बाजारपेठ दुसरी नाही. चीनची आता पूर्वीसारखी स्थिती नाही आणि त्यामुळे चीनच्या कार्स मग त्या कोणत्याही असोत विद्युत वाहने असोत की साध्या कार्स, आज त्यांना अमेरिकेची बाजारपेठ नाही. त्यामुळे टेस्ला यांना भारताची गरज आहे आणि भारतालाही टेस्लाही गरज आहे. त्यामुळे या चर्चेकडे दोघानींही सकारात्मक दृष्टीने पाहिले आणि त्याचे परिणाम दोन्ही देशांसाठी चांगलेच होणार आहेत. या चर्चेचे स्वागत करायला हवे.

# 'टीनएजर्सच्या पालकांकडून अपेक्षा'

वयाची दहा-बारा वर्षे मुलांशी आपण किती सहज बोलू शकतो, गप्पा मारू शकतो, चेष्टा, मस्करी करू शकतो. मात्र मुलं जसजशी टीनएजर्समध्ये येऊ लागतात त्यांच्याबरोबर आपलं असलेलं नातं, रिलेशनशिपमधलं सहजपण हरवून जातं, गुंतागुंतीला सुरुवात होते. आपल्या नात्यात गॅप पडत जातो. मुलांना वाटतं आपल्या आई-वडिलांनी आपल्या भावना समजून घ्याव्यात. त्यांच्या अपेक्षा आपल्या पालकांकडून अशा असतात की,

१. त्यांना फक्त उपाय नको असतात, तर त्यांनाही घरात किंमत मिळावी असं त्यांना वाटतं. पालक खूप लवकर एखादा प्रश्न सोडवावा या हेतूने परिस्थितीत उडी घेतात. जेणेकरून मुलांचा मार्ग सुरळीत व्हावा. मुलांनी आपल्याला त्यांची अडचण सांगितली, प्रॉब्लेम मांडला की, आपण तत्काळ उपाय देतो. दरवेळेला मुलांना त्यातून बाहेर पडण्याचा मार्गच हवा असतो असं नाही, तर कधीकधी मुलांची फक्त एवढीच अपेक्षा असते की, पालकांनी आमचं म्हणणं ऐकून घ्यावं, आमच्या बोलण्याला किंमत द्यावी. तुम्ही त्यांच्या प्रत्येक गोष्टीला, निर्णयाला मान्यता द्यावी, समर्थन करावं असं नाही. त्यांची एवढीच अपेक्षा असते की, आपल्या भावना खऱ्या आहेत, त्यांनाही महत्त्व आहे हे पालकांनी समजून घ्यावं. अशावेळी आपण असं म्हणून मुलांचं मन सांभाळू शकतो की, जे झालंय ते खरंच खूप कठीण आहे तुझ्यासाठी आणि मला कळतंय की तू नाराज का आहेस? आपण त्यांना आपल्या भावना ओळखून त्या समजून घ्यायला वेळ देऊ या. सोल्युशन्स नक्कीच मिळतील. पण खरी सहानुभूती ही उत्तम संवादासाठीची पार्श्वभूमी तयार करायला उपयोगी ठरते. जेव्हा मुलांच्या भावनांना किंमत दिली जाते, मूल्य समजून घेतलं जातं तेव्हा मुलं आपलं मन मोकळं करायला सुरुवात करतात, मिटून जात नाहीत.

२. मुलांची अपेक्षा असते की, आम्हाला स्वातंत्र्य मिळावं. खरं म्हणजे ही त्यांच्या आयुष्याची पहिली पायरी असते. त्यांच्याकडे बंडखोर मुलं म्हणून पाहू नका. वरवर पाहता असं वाटतं की, टीनएजर्सना आपल्याला स्वातंत्र्य मिळावं अशी इच्छा असते. मात्र पालकांना ती इच्छा जबरदस्तीने आपल्या अपेक्षा पूर्ण करण्याकडे ढकलणारी वाटते पण तसं नसतं. प्रत्यक्षात ते स्वतःची आयडेंटिटी, स्वओळख तयार करत असतात. त्यांना स्वतःचे निर्णय स्वतःच घ्यायचे असतात. मुलं जेव्हा स्वतःचे चॉईसेस घेतात तेव्हा ते अनुभवातून सेल्फ रिलायन्स शिकतात. ते आत्मनिर्भर होतात. त्यांचा आत्मविश्वास वाढतो.

त्यांची काळजी घेणारे पालक म्हणून त्यांना हॅन्डल केलंत, तर मुलं त्यांच्या वाढणाऱ्या जबाबदाऱ्या आत्मविश्वासाने पार पाडताना दिसतात. यातूनच ते स्वतःचा शोध घेत असतात. मुलांना या गोष्टी करण्यासाठी, स्वतःचा विकास करण्यासाठी आपण पुरेशी संधी दिली, तर आपलं नातं अधिक दृढ होईल. कारण मुलं असं समजतात की, आपल्यातील क्षमता आपले पालक जाणतात. तेच आपल्यातील क्षमतांना ओळखू शकतात.

३. त्यांना सृजनशीलतेची आस असते. परफेक्शनपेक्षा मुलांना ते जास्त महत्त्वाचं वाटतं. या वयातील मुलांच्या व्यक्तिमत्त्वात तुम्हाला कपट, ढोंग शोधूनही सापडत नाही. मोठी माणसं जेव्हा गोड बोलून मुलांना भुलवतात, भासवतात की त्यांना काहीच प्रॉब्लेम नाही. तेव्हा ते अक्षरशः हैराण होतात. मुलांना तुम्ही परफेक्ट पालक म्हणून असण्यापेक्षा स्वतःच्या आयुष्यातील चढ-उतार कसे हाताळता, त्यांना कसे सामोरे जाता हे पाहून त्यांना जास्त फायदा मिळू शकतो.

सगळ्याच प्रश्नांची उत्तरं तुमच्याकडे नसणार. हे तुम्ही मान्य करता आणि आयुष्य जगता. मुलं हे बघतात आणि त्यांना हे साम्य जाणवते की, आपले पालकही आपल्यासारखेच मनुष्यप्राणी आहेत. या आपापसातील सामंजस्यामुळे पालक आणि मुलं यांच्यामधील संवाद अधिक रुजत जातो, फुलतच जातो. कारण तुम्ही मुलांबाबत मुल्यमापनात्मक न होता त्यांचं सगळं म्हणणं ऐकून घ्याल असं त्यांना वाटतं. आपल्या अडचणी, दोष पालकांसमोर सांगू शकतो, इथे सांगणं सुरक्षित आहे असं मग त्यांना मनापासून वाटतं.

४. त्यांच्या रोजच्या आयुष्याइतकंच त्यांचं ऑनलाइन जगही महत्त्वाचं असतं. हे पालकांनी समजून घ्यावं, ही मुलांची अपेक्षा असते. मुलांच्या दृष्टीने ऑनलाइन जग हे महत्त्वाचे असल्याने त्याबद्दल एकदम निगेटिव्ह न बोलता किंवा ते तर एक नुसतं गेम वर्ल्ड आहे असं न म्हणता रील वर्ल्ड आणि रियल वर्ल्ड हे वेगवेगळं आहे असं म्हणून कमीत-कमी शब्दांत नाराजी व्यक्त करता येईल. कारण काही वेळेला हळूवार, संवेदनशील टीनएजर्स मुले-मुली यात इतके गुंतून जातात की, काही भावनिक प्रसंग पडद्यावर पाहताना त्यांचं मन खरंच दुखावलं जातं. शिवाय जर त्यांच्या मित्रांनी त्यांना 'अनफॉलो' केलं तरी ती बाब त्यांच्यासाठी क्षुल्लक नाहीतर खूप महत्त्वाची असते. हे 'सोशल रिजेक्शन' मुलं सोसू शकत नाहीत. मुलं ऑनलाईन असोत की, ऑफलाईन मुलांची स्वतःची मान्यता, मूल्य, किंमत, अस्तित्व, सेल्फवर्थ ही मोठ्या प्रमाणात त्यांचा पीअर ग्रुप काय प्रतिसाद देतो यावर अवलंबून असते. अर्थातच म्हणून तुम्ही मुलांना अनलिमिटेड स्क्रीनटाईम द्यावा असं नाही; परंतु त्यांचा अवास्तव अनुभव जो बहुतेक वेळा डिजिटल माध्यमातील असतो तरीही तोही महत्त्वाचा आहे हे पालकांनी समजून घ्यावं असं मुलांना वाटतं आणि यामुळे तुम्हाला त्यांना मार्गदर्शन करण्यात मदतच होत असते हेही तितकेच खरे आहे.

त्यांना ऑनलाईन किंवा आभासी जगापासून पूर्णपणे तोडून टाकण्यापेक्षा तुम्ही योग्य मर्यादा घालून मुलांना डिजिटल माध्यमं वापरण्याच्या जबाबदार सवयी लावू शकता उदाः मधून मधून ब्रेक घेणं किंवा स्क्रीन वापरणं कधी थांबवायचं, कुठे आणि कसा कंट्रोल करायचा हे समजून घेणं या गोष्टी आपल्याला मुलांकडून करून घ्याव्या लागतील.

५. टीनएजर्स आणि त्यांचे पालक यांच्या नात्यात आणि संवादात अडथळे येतात. अनपेक्षित अडचणी आणि समस्या येतात. टीनएजर्समधील मुलं शांत बसतात किंवा नुसतं हां, हं, हम्म, ओ. के, बरं, हो, नाही असं अगदी कमीत कमी बोलतात. जणू काही पालकांनी त्यांच्या मनातलं ओळखावं अशी परिस्थिती निर्माण होते. मुलं काही बोलायला लागली आणि पालक त्यांना बोलू न देता चूक, बरोबर सांगायला लागले, अडथळे निर्माण करायला लागले तर मुलांचं बोलणं बंद होतं. याऐवजी आपण असं म्हणू शकतो की 'तुला जर काही सांगायचं असेल, बोलायचं असेल तर मी आहे' आणि खरंच मग मुलांना तुमच्याशी बोलावसं वाटतं. त्यांना स्पेस मिळते. एकप्रकारे मुलांच्या मतांना, त्यांच्या म्हणण्याला आदर दिला जातो असं मुलांना वाटायला लागतं. मुलांचं नकारात्मक वागणं, ती भावना थोड्या प्रमाणात का होईना कमी होत जाते. या वयातील मुलांच्या मनात त्यांच्या भविष्याबद्दल बऱ्याच गुंतागुंतीच्या भावना असतात. याबद्दल शेअर करताना त्यांना अशी व्यक्ती हवी असते जी कोणत्याही प्रकारच्या निष्कर्षावर उडी न मारता एका उत्तम श्रोत्याची भूमिका निभावेल. या संवादात पालकांना खूप संयम ठेवावा लागतो. ठाऊक आहे की हे कठीण काम आहे पण त्याचा फायदाही होत असतो.

६. 'विश्वास' हा दोन्ही बाजूंनी ठेवावा लागतो. थोडक्यात पालकांनी मुलांवर विश्वास ठेवला, तर मुलंही तुम्हाला विश्वासार्ह वाटतील. तुमच्यात आणि तुमच्या टीनएजर्स मुलांमध्ये जी दरी निर्माण होते, त्याला कारणीभूत असतो अविश्वास म्हणूनच संवादाचा पूल बांधण्यासाठी 'विश्वास' उपयोगी ठरतो. तुम्ही मुलांवर विश्वास ठेवावा ही मुलांची अपेक्षा असते. 'विश्वास' ठेवायला तुम्ही कचरता ते मुलांच्या सुरक्षिततेच्या इच्छेने. मुलं कुठल्याही अडचणीत सापडू नयेत म्हणून तुम्ही विश्वास ठेवायला तयार नसता. पण जर तुमच्या टीनएजर्स मुलांवर तुम्ही सतत लक्ष ठेवत असाल, चुकले की त्यांना पकडत असाल किंवा वारंवार आपले पालक आपल्यावर 'हेलिकॉप्टरसारखे' गिरक्या घालत असतात असं त्यांना वाटत असेल, तर ते चांगल्या गोष्टींबाबतसुद्धा तुमच्याशी बोलणार नाहीत. योग्य मर्यादा आखून, मुलांची प्रायव्हसी जपून, मुलांचा आदर राखून पालक आणि मुलं यांच्यात विश्वासाचा पूल तयार होऊ शकतो. जर तुम्ही असं म्हणत असाल की, त्यांच्यावर जी बंदी तुम्ही घालता ती त्यांनी सहन करावी, त्यांचा ठावठिकाणा, थांगपत्ता याबद्दल तुम्हाला माहिती द्यावी. तुम्ही त्यांना सतत मायक्रोमॅनेज करत असाल. त्यांच्या प्रत्येक हालचालींवर लक्ष ठेवून असाल, सगळी बारीकसारीक माहिती मिळवत असाल, तर मग मुलांचं नाराज होणं स्वाभाविकच आहे. त्यातूनच मग मुलं खोटं बोलायला लागतात. माहिती, मित्रपरिवार याबद्दल बोलणं टाळतात, दडवून ठेवतात. आपण काही प्रतिक्रिया दिली, तर त्याचे परिणाम होतील याची मुलांना जाणीव होते मग ते गप्पच राहणं पसंत करतात. कुमारावस्थेतील मुलांचं पालकत्व निभावणं म्हणजे नकाशा न वापरता टीनएजर्सचा चक्रव्यूह भेदायचा असतो. या वयातील मुलं स्वतःच अस्तित्व, आयडेंटिटी ओळखायची धडपड करत असतात. स्वतःच्या मर्यादा आखण्याचा प्रयत्न करतात. त्यातूनच त्यांच्या मनातील भावनांची आंदोलने, त्यांचे चढ-उतार होत असतात. त्यांच्या म्हणण्याला महत्त्व देऊन, त्यांच्या वाढत्या स्वातंत्र्याचा आदर करून, बोलण्यापेक्षा ऐकण्यावर भर देऊन आपणही त्यांच्या या प्रवासात त्यांच्यासोबत आहोत हे त्यांना दाखवायला हवे. काही वेळेला खरोखरच आपल्याकडे सगळ्या गोष्टींची उत्तरं नसतात हे आपल्याला मान्य करायला हवे. हे जर मुलांशी तुम्ही बोलत राहिलात, तर मुलं तुमच्याकडे परत येण्याचा मार्ग तयार होतो. तुम्ही तो मार्ग जोपासत आहात हे लक्षात घ्या. टीनएजर्स मुलं ही अंडर कन्स्ट्रक्शन अवस्थेत असतात. म्हणूनच आपण आपलं फस्ट्रेशन त्यांच्यावर न काढता संयम आणि सहानुभूतीने त्यांच्याशी वागलो, तर हे नातं समजुतीचं होईल. अखेरीस टीनएजर्स मुलं आपण कोण आहात याचाच फक्त शोध घेत नसतात, तर जगातील परिस्थितीशी जुळवून घेणं यासाठीही प्रयत्न करत असतात हे आपण पालकांनी लक्षात ठेवायला हवं. थोडेसे सजग राहून प्रयत्न केला तर, आपण त्यांना किती छान गाईड केलं हे त्यांना मोठं झाल्यावर कळेल. जेव्हा मुलं मागे वळून आपल्या बदलाची वर्षे आठवतील तेव्हा त्यांना नक्कीच मनाशी वाटेल की, आपल्या आई-वडिलांनी खूप संयमाने, समजुतीने आणि विश्वासाने आपल्याला वागवले.

# केसांना मऊ आणि मजबूत बनवण्यासाठी एवोकॅडो हेअर मास्क वापरा

एवोकॅडो आपल्या शरीरासाठी खूप फायदेशीर आहे. पण तुम्हाला माहिती आहे का की ते केसांसाठीही फायदेशीर आहे. एवोकॅडोमध्ये अनेक पोषक घटक आढळतात. व्हिटॅमिन ए, बी, सी, डी, झिंक, लोह, पोटॅशियम आणि बीटा कॅरोटीन यांसारखे पोषक घटक त्यात आढळतात. एवोकॅडो केसांचे पोषण तर करतेच पण केसांचा कोरडेपणा दूर करण्यासही मदत करते. एवोकॅडो केस गळणे थांबवते आणि केसांच्या वाढीस प्रोत्साहन देते. ते केसांना लावल्याने केस रेशमी आणि चमकदार होतात.



बाजारात अनेक प्रकारचे एवोकॅडो हेअर मास्क उपलब्ध आहेत. पण कधी कधी या प्रकारचे हेअर मास्क केसांना शोभत नाही. त्याच वेळी, त्यांचा वापर केल्याने इच्छित परिणाम मिळत नाही. अशा परिस्थितीत तुम्ही घरच्या घरी एवोकॅडो हेअर मास्क बनवून केसांना लावू शकता. हा मास्क घरी बनवल्याने नैसर्गिक तर होईलच पण केसांशी संबंधित अनेक समस्याही दूर होतील. हा एवोकॅडो मास्क केसांना अंतर्गत पोषण तर करेलच पण कोरड्या केसांच्या समस्येपासूनही आराम देईल. कोरड्या केसांसाठी एवोकॅडो हेअर मास्क कसा बनवायचा ते जाणून घेऊया एवोकॅडो आणि नारळ तेल हेअर मास्कचे साहित्य

**पिकलेला एवोकॅडो- १**

**नारळ तेल - २ चमचे**

**असे बनवा हेअर मास्क**

हेअर मास्क बनवण्यासाठी सर्व घटक मिसळून अॅव्होकॅडो आणि खोबरेल तेलाचे मिश्रण तयार करा. हे केस आणि स्कॅल्प वर सुमारे २० मिनिटे लावा. त्यानंतर केस शॅम्पूने धुवा. केसांना पोषण देण्यासोबतच हा मास्क केस गळण्याची समस्या देखील कमी करतो. हा मास्क केसांवर एक थर तयार करतो आणि सूर्याच्या हानिकारक किरणांपासून केसांचे संरक्षण करतो.

**एवोकॅडो आणि मधाचे हेअर मास्कचे साहित्य**

**पिकलेला एवोकॅडो - १ टीस्पून**

**मध - १ टीस्पून**

**ऑलिव्ह ऑइल - १ टीस्पून**

**असे बनवा हेअर मास्क**

**एवोकॅडो आणि मधाचा हेअर मास्क** बनवण्यासाठी या सर्व गोष्टी एका वाडग्यात चांगले मिसळा. यानंतर, हे मिश्रण केस आणि टाळूवर हलक्या हाताने लावा. २० मिनिटे ठेवल्यानंतर केस सौम्य शाम्पूने धुवा. हा मास्क तुमच्या केसांना नुकसान होण्यापासून वाचवतो आणि कोरड्या केसांच्या समस्येपासून आराम देतो.

**एवोकॅडो आणि एलोवेरा हेअर मास्क-**

**पिकलेला एवोकॅडो- १**

**एलोवेरा जेल- १ टीस्पून**

**असे बनवा हेअर मास्क**

एवोकॅडो आणि एलोवेरा जेल एका भांड्यात चांगले मिसळा. नंतर केसांच्या टोकावर आणि स्कॅल्प वर सुमारे २० मिनिटे लावा. या शैम्पू नंतर. हा हेअर मास्क तुमच्या केसांना पोषण देईल आणि चमकदार करेल.

# जायफळ एक गुण अनेक!

जायफळमध्ये कफ आणि वात, घामाचा दुर्गंध, जंत, खोकला, श्वास घेण्यास होणारा त्रास, हृदयरोग अशा व्याधींपासून मुक्ती देणारे गुणधर्म आहेत. जायफळ वेदनाशामक, वातशामक आणि कृमीनाशक आहे. पचनसंस्थेचे कार्य सुरळीत करण्यासाठी जायफळाचा खूप उपयोग होतो. जायफळाच्या तेलात आणि चूर्णातही औषधी गुणधर्म आढळतात. त्याचा विविध प्रकारे उपयोग करता येतो. दगडावर जायफळ पाण्याबरोबर घासावे आणि लेप तयार करावा. हाल लेप डोळ्यांच्या पापण्यावर आणि आजूबाबूला लावल्याने दृष्टी तेज होते. तसेच चेहर्यावरील डाग नाहीसे होतात. संधिवातामुळे शरीराला असह्य वेदना होतात. संधिवातावर उपचार म्हणून तसेच जखम होणे, चमक भरणे, सूज येणे अशा वेळी जायफळ आणि सरसोचे तेल एकत्र करून मालिश केल्याने आराम मिळतो. या मिश्रणाने मालिश केल्याने शरीरात उष्णता निर्माण होते आणि घामाच्या स्वरूपात रोग नाहीसा होतो. पोटात दुखत असेल तर जायफळाच्या तेलाचे २-३ थेंब साखरेत मिसळून खावेत. दातांच्या वेदना दूर करण्यासाठीही जायफळाचा उपयोग होतो. सर्दी आणि डोकेदुखीपासून मुक्ती मिळविण्यासाठी जायफळाची पावडर गरम पाण्यात एकत्र करून तो लेप नाकाच्या आजूबाजूला आणि कपाळावर लावणे फायदेशीर ठरते. बाळाला कफ झाला असताना किंवा रात्री झोप लागत नसेल तर हा लेप उपयोगी पडतो.



बाळाला वरचे दूध पिण्याची सवय लावणे हे प्रत्येक आईसाठी कठिण काम असते. वरचे दूध पचत नसेल तर दुधामध्ये थोडे पाणी मिसळून त्यात जायफळ घालून उकळावे. दूध कोमट झाल्यावर हळूहळू बाळाला पाजावे. असे केल्याने बाळाला दूध पचते.

# भाषा हे राजकारण्यांच्या हातातले हत्यार नाही!

भाषा हा शिक्षणातील पायाभूत घटक आहे. ती माणसाच्या अस्तित्वाची ओळख असल्यामुळे शिक्षणातील भाषा अध्यापनाचा विचार अतिशय सूक्ष्मपणे केला गेला पाहिजे. महाराष्ट्रात तो झाला असता, तर आज मराठी शाळांची शोकांतिका झाली नसती. शालेय पातळीवर शिक्षणाचे मराठी माध्यम म्हणून मराठीची जी हेळसांड झाली आहे, तिच्याविषयी बोलताना मन अस्वस्थ होते. शिक्षणाच्या बाबतीत इंग्रजीकरणाचे खापर लॉर्ड मेकॉलेच्या माथ्यावर मारून मोकळे होणे जास्त सोयीचे आहे पण मुद्दा हा आहे की स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आपल्या शिक्षणाचे भारतीयीकरण करण्यापासून आपल्याला कुणी रोखले होते का? तुरळक अपवाद वगळता एकूणच भारतात मातृभाषेतील शिक्षण आपण प्रस्थापित करू शकलो नाही. महाराष्ट्रात १९७० नंतर मराठी माध्यमाच्या शिक्षणाची जागा इंग्रजीतील शिक्षणाने घेतली. जागतिकीकरणाच्या झंझावातात शिक्षणातील मराठीचे स्थान हिरावून घेतले गेले. इंग्रजी शाळांचे स्तोम आणि मराठी शाळांची उपेक्षा असे आजचे विदारक वर्तमान आहे.

बदलापूर येथील आदर्श महाविद्यालयात नुकतीच डॉ. प्रकाश परब यांनी अभिजात मराठीवरील चर्चासत्रातील त्यांच्या बीजभाषणात जागतिक पातळीवरील युनेस्कोच्या अहवालाचा संदर्भ देत धोक्याच्या वळणावर असलेल्या भाषांचे संदर्भ देत त्यामागच्या कारणांची मांडणी केली.

पुढल्या पिढीपर्यंत आपल्या भाषेचा आणि बौद्धिक संपदेचा वारसा पोहोचवण्यात मराठी भाषिक कमी पडत असल्याने मराठी ही सुरक्षित आहे असे आपल्याला म्हणता येणार नाही. इटालियन भाषकांनी त्यांची भाषा टिकावी म्हणून आटोकाट प्रयत्न केले. वेल्श भाषेला ती लुप्त होण्यापासून तिच्या भाषकांनी वाचवले. मावरी भाषेसाठी असेच प्रयत्न केले गेले. जगभरात अनेक असे दाखले आज उपलब्ध आहेत. भाषा संपते म्हणजे ती आत्महत्या करत नाही. तिची हत्या होते. तिचे भाषकच तिचे जगणे वा मरणे ठरवतात. समाजापाशी इच्छाशक्ती नसेल, तर शासनाने तिला जगवण्याचे उत्तरदायित्व घ्यावे, तिच्या मागे त्यासाठी आवश्यक ते पाठबळ उभे करावे अशी भाषेच्या संदर्भात परब सरांनी केलेली मांडणी अत्यंत महत्त्वाची आहे.

आपल्याकडे मात्र शासन स्तरावरूनच मराठीच्या अहिताचे निर्णय घेतले जावेत यासारखे दुःख नाही. 'पहिली ते पाचवी हिंदी सक्तीची' ही ठिणगी शासनाने नुकतीच टाकली आहे. हळूहळू ही ठिणगी जाळ होऊन धगधगते आहे. भारत हा बहुभाषिक देश आहे. प्रत्येक भाषेची स्वतंत्रशैली आणि वैशिष्ट्ये आहेत. भाषावार प्रांतरचनेनुसार प्रत्येक राज्याची राजभाषा आहे. त्या-त्या राज्यात शिक्षण, प्रशासन, कायदा अशा सर्व क्षेत्रांमध्ये राज्यभाषेला प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न करीत राहणे हे त्या-त्या शासनाचे कर्तव्य आहे. या कर्तव्यापासून ढळून महाराष्ट्रात मराठीखेरीज अन्य कोणत्याही भाषेची सक्ती करता येणार नाही. पहिली ते पाचवी हे भाषा आत्मसात करण्याचे वय आहे, पण याचा अर्थ मुलांच्या डोक्यावर आपण वाटेल तसे भाषांचे ओझे टाकावे, हे कुठल्याही मेंदू आधारित शिक्षणात बसत नाही. भाषा हे राजकारण्यांच्या हातातले हत्यार म्हणून वापरले जाते तेव्हा कोणत्याच भाषेचे भले होत नाही. हिंदीच्या पहिलीपासूनच्या सक्तीचा निर्णय महाराष्ट्र शासनाने त्वरित मागे घ्यावा कारण हे भाषिक अराजक ना हिंदीचे

बीड **सरकार**

सोमवार दिनांक २१ एप्रिल २०२५



# विशेष वृत्त

## नागझरी फाटा येथे कारच्या धडकेत एकाचा मृत्यू

**गेवराई :** धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर नागझरी शिवारात शुक्रवारी (दि.१८) दुपारी ४ वाजेच्या सुमारास कारच्या धडकेत दुचाकीवरुन जाणाऱ्या विठ्ठल विश्वनाथ घाडगे (वय ५५, रा. धोंडराई ता. गेवराई) यांचा गंभीर मार लागल्याने मृत्यू झाला. याबाबत पोलिसांच्या माहितीनुसार, विठ्ठल घाडगे हे दुचाकीवरुन (क्र.एम.एच १६ ए. के ४२४०) शहापुर शहागडवरून धोंडराईकडे जात होते. या दरम्यान नागझरी शिवारात एका हॉटेलसमोर भरधाव कार (क्र. एम.एच १२ क्यु.टी ७३१६) चालकाने हयगयीने व निष्काळजीपणे कार चालवून दुचाकीला जोराची धडक दिली. या अपघातात विठ्ठल घाडगे हे गंभीर जखमी होवून त्यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी घाडगे यांच्या मृत्युस कारणीभूत ठरल्याने अनोळखी कार चालकाविरुद्ध गेवराई ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

## मंदिरात गाणे लावू दिले नाही, एकास मारहाण

**केज :** गावात अखंड हरिनाम सप्ताह चालू असताना मंदिरात गाणे का वाजवू देत नाही म्हणून शिवीगाळ करून डोक्यात दगड मारून जखमी केले आहे.

केज तालुक्यातील सावळेश्वर (पैठण) येथील महादेव मंदिरात अखंड हरिनाम सप्ताह सुरू असताना तेथे ऋषीकेश गणेश मस्के, (२८ वर्ष) हा उभा होता. त्यावेळी दत्तात्रय विनायक मस्के हा तेथे आला व ऋषिकेश याला म्हणाला की, तु मला मंदिरात गाणे का वाजवु का देत नाहीस ? असे कारण काढुन शिवीगाळ केली. ऋषिकेश त्याला म्हणाला की, शिव्या का देतोस ? असे म्हणताच दत्तात्रय मस्के याने ऋषिकेश याला लाथाबुक्यांनी मारहाण करुन त्याने हातातील दगड डोक्यात मारुन ऋषेकेश याला जखमी केले. या प्रकरणी ऋषिकेश मस्के याने युसुफवडगाव पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारी वरून दत्तात्रय म्हस्के याच्या विरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल सत्यपाल कांबळे हे तपास करीत आहेत.

## मद्यपी वाहकाने घातला बस स्थानकात गोंधळ, गुन्हा नोंद

**बीड:** मद्यपी बस वाहकाने बीडच्या बसस्थानकात रात्रीच्या वेळी आरडाओरडा करुन गोंधळ घातल्याचा प्रकार घडला. या प्रकरणी वाहतूक निरीक्षकांनी दिलेल्या तक्रारीवरुन वाहका विरोधात शिवाजीनगर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. रघुनाथ भिमराव इंगळे (रा. अंबीका नगर, सोलापूर) असे मद्यपी वाहकाचे नाव आहे. तो १९ एप्रिल रोजी रात्री बीड बसस्थानकात बस घेऊन आला होता. यावेळी त्याने दारु पिऊन रात्री १ वाजेच्या दरम्यान बसस्थानकात गोंधळ घातला. आरडाओरडा करुन काही जणांना शिविगाळ केली. कर्मचाऱ्यांनी हा प्रकार वरिष्ठांच्या कानावर घातला. यानंतर वाहतूक निरीक्षक भिमकिरण बनसोडे यांच्या तक्रारीवरुन वाहक रघुनाथ इंगळे विरोधात शिवाजीनगर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## बसमध्ये महिलेच्या पर्समधून ५७ हजारांची रोकड लंपास

पाटोदा बस प्रवासात महिलेच्या पर्स मधील ५७ हजार ३०० रुपयांची रोकड अनोळखी महिलेने लंपास केल्याची घटना घडली. या प्रकरणी पाटोदा पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. लक्ष्मी भिमराव डफळ (४५, रा. जामखेड जि. अहिल्यानगर) यांनी याबाबत तक्रार दिली. त्यांच्या तक्रारीनुसार, त्यांनी पाटोदा येथील महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या शाखेतून ५७ हजार ३०० रुपये काढले होते. हे पैसे घेऊन त्या गावी जामखेड येथे जात होत्या. यावेळी पाटोदा बसस्थानकावर बसमध्ये त्यांच्या शेजारी बसलेल्या अनोळखी महिलेने हातचलाखीने लक्ष्मी डफळ यांच्या पर्समधून ही रक्कम लंपास केली. पैसे चोरी गेल्याचा प्रकार समोर आल्यानंतर त्यांनी पाटोदा पोलिसांत धाव घेत तक्रार दिली. यावरुन अज्ञात महिलेविरोधात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पोलिस अधिक तपास करत आहेत.

## सौर ऊर्जेच्या बारा प्लेट चोरट्यांनी लांबवल्या

### बीड तालुक्यातील रुई शहाजानपूर शिवारातील घटना

**बीड:** तालुक्यातील रुई शहाजानपुर शिवारातील सौर ऊर्जा प्लांटच्या १२ प्लेट चोरट्यांनी लंपास केल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी बीड ग्रामीण पोलीस ठाण्यात अज्ञाताविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान मागील काही दिवसांपूर्वी नेकनूर पोलीस ठाणे हद्दीत लिंबागणेश शिवारात तारांची चोरी झाली होती. हा गुन्हा नंतर उघडकीस झाला आहे. त्यानंतर आता पुन्हा सौर ऊर्जा प्लेटची चोरी झाली आहे. याबाबत शेतकरी विनायक बाबुराव शहाणे (रा. पांगरी रोड, बीड) ग्रामीण पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली आहे. चोरट्यांनी १६ व १७ एप्रिलच्या मध्यरात्रीच्या सुमारास त्यांच्या शेतातील विहीर व बोअरवर बसवलेल्या सौर उर्जेच्या १२ प्लेट चोरून नेल्या. यातील एका प्लेटची किंमत ही १३ हजार असून या घटनेत चोरट्यांनी शेतकऱ्याच्या मालकीच्या एक लाख ५६ हजार रुपये किमतीच्या सौर प्लेट लंपास केल्याप्रकरणी बीड ग्रामीण पोलीस ठाण्यात अज्ञाताविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करत आहे.

## चोरटी वाळू वाहतूक करणारा ट्रॅक्टर पकडला

**गेवराई :** तालुक्यातील पांचाळेश्वर शिवारातील गोदावरी नदी पात्रात आवेदरीत्या वाळू उत्खनन करून नंतर ट्रॉलीमध्ये भरून त्या वाळूची चोरटी विक्री करताना पोलिसांनी छापा मारला. यावेळी पोलिसांना पाहून चालक-मालक ट्रॅक्टर जागीच सोडून पळून गेले. या कारवाईत ोलिसांनी ट्रॅक्टर टॉली आणि एक ब्रास वाळू असा एकूण चार लाख ५३ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई १८ एप्रिल रोजी पहाटे ५ वाजेच्या सुमारास करण्यात आली. याप्रकरणी सहाय्यक फौजदार अनिल चांदमारे यांच्या तक्रारीवरुन अज्ञात ट्रॅक्टर चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

# आंतरराज्य गुन्हेगाराच्या पोलिसांनी आवळल्या मुसक्या

## माजलगाव शहर पोलिसांच्या कामगिरीबद्दल आयुक्ताचे प्रशस्तीपत्र



**माजलगाव (प्रतिनिधी):** गुजरात राज्यातील सुरत येथील खून आणि खंडणीच्या गंभीर प्रयत्नातील आरोपीला माजलगाव शहर पोलीसांनी सुरत पोलीसांच्या खबरीवरुन शिताफीने अटक केली होती. याची दखल सुरत पोलीस आयुक्तांनी घेत जिल्हा पोलीस अधीक्षक नवनित कावत, उपअधीक्षक बी.धीरज कुमार, निरीक्षक राहुल सुर्यतळ यांच्यासह त्यांच्या टीमचे अभिनंदन करत नुकतेच प्रशस्तीपत्र दिले आहे.

सुरत पोलिसांना गुंगारा देणारा गंभीर गुन्ह्यातील आरोपी भरत भोजाभाई बरार हा मराठवाड्यातील माजलगाव परिसरात असल्याचे लोकेशन सुरत पोलीसांना मिळाले होते. व ते त्या आरोपीच्या मागावर बीड जिल्ह्यात येत होते. मात्र अंतर लांब असल्याने आरोपी ठिकाण बदलण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने सुरत पोलीसांनी बीड व माजलगाव शहर पोलीसांना या बाबत संपर्क करत आरोपी पकडण्यात सहभाग घेण्याची विनंती केली. यावर शहर पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ यांनी तात्काळ पडताळणी करत पोलीसांना गुप्त शोध घेण्याचे आदेश दिले यावर पी.एस.आय. केरबा माकणे, पो.ह. गणेश भंडाने, पो.ह. किशोर जाधव यांनी आरोपीचा शोध घेतला. गुप्तता बाळगत सुरत पोलीस टिम येताच आरोपी लपलेल्या ठिकाणी छापा मारत आरोपीच्या मुसक्या आवळल्या. व आरोपी सुरत पोलीसांच्या ताब्यात दिला. या आरोपीने खुन खंडणी, दरोडा, असे गंभीर गुन्हे करुन तो मराठवाडयात फरार झाला होता. सुरत परिसरात त्याची डॉन म्हणून दहशत होती. शहर पोलीसांनी त्याला सुरत पथक येताच काही मिनीटातच ताब्यात घेवून सुरत पोलीसांच्या ताब्यात दिले. यावर सुरत पोलीस आयुक्त अनुपमसिंग गहलौत यांनी प्रशस्तीपत्र पाठवत आभार व्यक्त करत मदत करण्यासाठी मी तुमचे आणि तुमच्या समर्पित टीमचे मनापासून आभार आणि कौतुक करतो. तुमचा तत्पर प्रतिसाद, व्यावसायिकता आणि न्यायप्रती वचनबद्धता यांनी तपासाच्या यशात महत्त्वाची भूमिका बजावली. तुमच्या पोलिस स्टेशन टीमने लॉजिस्टिकल सहाय्य आणि आवश्यक संसाधने पुरवण्यात केलेल्या सहकार्याने आरोपी व्यक्तीला त्वरीत अटक करण्यात मोठा हातभार लावला. तुमचं आणि तुमच्या टीमचं समर्पण आणि आमच्या तपास अधिकारी आणि टीमसोबतचा समन्वय हे न्यायाच्या शोधात आंतरराज्य पोलिसांच्या सहकार्याच्या भावनेचं उदाहरण देतात. मी तुमचे आणि आरोपी व्यक्तीला अटक करण्यात सहभागी असलेल्या सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचेही मनापासून कौतुक करतो. त्यांची बांधिलकी आणि परिश्रम पोलीस सेवेतील सर्वोच्च दर्जा दर्शवतात. अशी अनुकरणीय टीमवर्क कायद्याची अंमलबजावणी करण्याच्या प्रयत्नांना बळ देते आणि सर्वांसाठी एक सुरक्षित समाज निर्माण करते. असे प्रशस्तीपत्र पत्र देत पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत, निरीक्षक राहुल सुर्यतळ, पी.एस. आय. केरबा माकणे, पो. ह. राम भंडाणे, पो.ह. किशोर जाधव यांचे अभिनंदन केले आहे.

## अमोल मुळे यांना पुरस्कार जाहीर

**बीड(प्रतिनिधी) :** शहरातील पद्मपाणी प्रतिष्ठानच्या वतीने देण्यात येणारा राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार बीड येथील पत्रकार अमोल भास्कर मुळे यांना जाहीर करण्यात आला आहे.



प्रतिष्ठानचे अध्यक्ष दिलीप तरकसे यांनी या पुरस्काराची घोषणा केली. बीड येथील पद्मपाणी प्रतिष्ठानच्या वतीने १७वर्षांपासून संविधान दिनाचे औचित्य साधून विविध - क्षेत्रातील कर्तृत्ववान व्यक्तींचा पुरस्कार देऊन गौरव करण्यात येतो. यंदाही पुरस्कारासाठी निवड समितीची बैठक नुकतीच पार पडली. यामध्ये पत्रकारिता क्षेत्रातून आदर्श पत्रकारिता पुरस्कार पत्रकार अमोल मुळे यांना जाहीर करण्यात आला. सन्मानचिन्ह, संविधानाची प्रत, सन्मानपत्र असे पुरस्काराचे स्वरुप आहे. ४ मे रोजी बीड येथील यशवंतराव चव्हाण - नाट्यगृहात मान्यवरांच्या उपस्थितीत पुरस्कार वितरण सोहळा होणार आहे.

## जून महिन्यात बीडला मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत पोलीस परिवार अस्तित्व मेळावा


**बीड (प्रतिनिधी):-** मुख्यमंत्री ना. देवेंद्रजी फडवणीस यांच्यासोबत चर्चा केली जून महिन्यात बीड येथे माननीय मुख्यमंत्री यांच्या प्रमुख उपस्थितीत पोलीस परिवार अस्तित्व मेळावा संपन्न होणार आहे.



शनिवारी नारळी सप्ताहासाठी घाटशीळ पारगाव तालुका शिरूर कासार जिल्हा बीड येथे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आले होते. राज्याच्या पोलिस परिवाराच्या पाठीशी खंबीर उभा असणारा पालकत्व असणारे माननीय मुख्यमंत्री पोलिसांच्या अनेक प्रश्नांसाठी मुख्यमंत्री यांना विनंती केली की पोलीस परिवार अस्तित्व मेळावा घ्यायचा आहे. तात्काळ म्हणजे पोलिसांच्या अडचणी सोडवण्यासाठी जून महिन्यामध्ये बीड येथे मी येतो येत्या जून महिन्यामध्ये महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटना अंतर्गत महाराष्ट्र पोलीस परिवार अस्तित्व मिळावा संपन्न होणार आहे या मेळाव्यात महाराष्ट्र पोलीस, सेवानिवृत्त पोलीस अधिकारी कर्मचारी, जेल पोलीस, होमगार्ड, एस आर पी एफ पोलीस, रेल्वे पोलीस, महाराष्ट्र पोलीस क्लॅरिकल संघटना, महाराष्ट्र पोलीस भरती प्रशिक्षण अकॅडमी, एमपीएससी स्पर्धा परीक्षा संघटना, पोलीस भरती करणारे तमाम युवक, महाराष्ट्रातील अनेक बेरोजगार युवक आणि अनेक सामाजिक संघटना मिळून बीड येथे भव्य दिव्य माननीय मुख्यमंत्री यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये जून महिन्यात बीड शहरात पोलीस परिवार अस्तित्व मेळावा संपन्न होणार आहे असे महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटना संस्थापक अध्यक्ष राहुल दुबाले यांनी म्हटले आहे.

## बीड ते वडवणी रेल्वे इंजिनची पहिली चाचणी

**वडवणी (प्रतिनिधी):** अहमदनगर ते बीड रेल्वे रुळाचे काम पूर्ण झालेल असून यामध्ये बीड ते वडवणी रेल्वे रूळावरून रेल्वे इंजिनची माल वाहतूक जोडलेले डब्यासह चाचणी करण्यात आली आहे. अहमदनगर बीड परळी रेल्वे रुळाचे काम जलद गतीने सुरू असून यामध्ये अहमदनगर ते बीड रेल्वे रुळाचे काम पूर्ण झालेले असून यावर काही महिन्यापूर्वी जलद रेल्वेची चाचणीही पूर्ण झालेली असून आता बीड ते वडवणी या रेल्वे मार्गावरील रुळाचे आथरण्याचे काम पूर्ण झाले असून अहमदनगर येथून बीड रेल्वे स्टेशनवर रेल्वे इंजिन मालवाहतूक डब्यासह दाखल झालेले होते यामध्ये काल रविवार रोजी बीड येथून बिंदुसरा नदीच्या रेल्वेच्या पुलावरून रविवारी हे इंजिन दहाच्या स्पीडने वडवणी पर्यंत झालेल्या मूळ मार्गावर धावले असून यामध्ये बीड ते वडवणी पर्यंत रेल्वे इंजिनच्या चाचणी घेण्यात आली आहे तरी बीड जिल्हा वाशियांचे रेल्वे मध्ये बसण्याचे स्वप्न काही काळात पूर्ण होणार असून यामध्ये काल बीड ते वडवणी रेल्वे मार्गावर इंजिनची धावण्याची चाचणी झाल्याने या मार्गातील गावकऱ्यांनी आनंद व्यक्त केला आहे.




## बसमध्ये महिलेच्या पर्समधून ५७ हजारांची रोकड लंपास

**बीड (प्रतिनिधी):** पाटोदा बस प्रवासात महिलेच्या पर्स मधील ५७ हजार ३०० रुपयांची रोकड अनोळखी महिलेने लंपास केल्याची घटना घडली. या प्रकरणी पाटोदा पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

लक्ष्मी भिमराव डफळ (४५, रा. जामखेड जि. अहिल्यानगर) यांनी याबाबत तक्रार दिली. त्यांच्या तक्रारीनुसार, त्यांनी पाटोदा येथील महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या शाखेतून ५७ हजार ३०० रुपये काढले होते. हे पैसे घेऊन त्या गावी जामखेड येथे जात होत्या. यावेळी पाटोदा बसस्थानकावर बसमध्ये त्यांच्या शेजारी बसलेल्या अनोळखी महिलेने हातचलाखीने लक्ष्मी डफळ यांच्या पर्समधून ही रक्कम लंपास केली. पैसे चोरी गेल्याचा प्रकार समोर आल्यानंतर त्यांनी पाटोदा पोलिसांत धाव घेत तक्रार दिली. यावरुन अज्ञात महिलेविरोधात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पोलिस अधिक तपास करत आहेत.

## युगप्रवर्तक क्रिकेट चषक सुंदरराव सोळंके महाविद्यालयाच्या संघाने पटकावला

**माजलगाव (प्रतिनिधी):-** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित युगप्रवर्तक क्रिकेट चषक सुंदरराव सोळंके महाविद्यालयाच्या प्राध्यापक संघाने कॉलिटी संघाचा पराभव करून सलग दुसऱ्या वर्षी युगप्रवर्तक चषक पटकावला.



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघाच्या वतीने कर्मचाऱ्यांसाठी युगप्रवर्तक क्रिकेट चषकाचे आयोजन करण्यात आले होते. अंतिम सामना सुंदरराव सोळंके महाविद्यालय व क्वॉलिटी संघात झाला. अंतिम सामन्यात क्वॉलिटी संघाने विजयासाठी ८२ धावाचे लक्ष दिले होते. सुंदरराव सोळंके महाविद्यालयातील प्राध्यापक संघाने खेळाचे उत्कृष्ट प्रदर्शन करत क्वालिटी संघाचा ९ गाड्यांनी दणदणीत पराभव के ला. सुंदरराव सोळंके महाविद्यालयाच्या प्रा. रोहित शेठे यांनी उत्कृष्ट फलंदाजी करत स्पर्धेत तीन वेळा अर्धशतक ठोकले. त्यांना मॅन ऑफ द सिरीज देण्यात आला. बेस्ट बॅस्ट्मन म्हणून प्रा. सिद्ध कदम यांना तर बेस्ट बॉलर म्हणून कर्णधार प्रा. अमोल गायकवाड यांना पारितोषिक देण्यात आले. स्पर्धेचे पारितोषिक वितरण पो. नि. राहुल सुर्यतळ यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी रमेश फपाळ, कास्ट्राईबचे तालुकाध्यक्ष राहुल टाकणखार, भारत टाकणखार, वसंत टाकणखार, पीएसआय माकने, इम्रान नाईक, मुख्याध्यापक अभिमन्यू इबीते, शिवाजी भाळशंकर, राहुल खुणे, नितीन पुट्टेवाड, किरण शिंदे आदींची प्रमुख उपस्थिती होती. युगप्रवर्तक चषक जिंकल्याबद्दल संघातील खेळाडू कर्णधार प्रा. अमोल गायकवाड, प्रा रोहित शेटे, , प्रा. अरुण पेंटावार, प्रा. सुदर्शन स्वामी प्रा. सिद्धेश्वर कदम, प्रा. स्वप्नील टाक, प्रा. महेंद्र वानखेडे, प्रा.प्रविण कोरडे, प्रा. ममताराम येवले, रामदास इसानकर, हितेंद्र काळे, प्रा. कार्तिक ाचलेगावकर, प्रा. एकनाथ शेंडगे, प्रा. इझम्मान पठाण यांचे म. शि.प्र. मंडळाचे अध्यक्ष आ. प्रकाशदादा सोळंके यांच्यासह ॲड.बी.आर.डक, प्राचार्य डॉ. जी. के. सानप, उपप्राचार्य डॉ. एन. के. मुळे, उपप्राचार्य एम.ए. कव्हळे, प्रबंधक प्रशांत चव्हाण अधीक्षक सतीश एरंडे यांच्यासह प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

## रोटरी क्लबच्या वतीने भव्य डान्स स्पर्धेचे आयोजन

**केज (प्रतिनिधी):** प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी रोटरी क्लब ऑफ केज यांच्या वतीने केज शहर व तालुक्यातील कुशल व गुणी कलाकारांना रंगमंच उपलब्ध करून देण्याकरिता येत्या १ मे महाराष्ट्रदिन व कामगारदिनाचे चे औचित्य साधून केज शहरातील हनुमान मंदिर (वकिलवाडी) समोरील प्रांगणात सायंकाळी ठीक ६ वाजता भव्य डान्स स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत केज तालुक्यातील सर्व गुणी कलाकारांना आपली कला दाखवण्याची संधी दिली जाणार आहे. या स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या कलाकारांना २८ एप्रिल रोजी आपल्या डान्स ची रंगीत तालीम द्यावी लागेल. यामध्ये निवड होणाऱ्या कलाकारांनाच १ मे रोजीच्या स्पर्धेत संधी दिली जाईल. रंगीत तालीम २८ एप्रिल रोजी सायंकाळी ४ वाजता भोसले ब्रिलिअन्स क्लासेस केज च्या हॉल मध्ये पार पडेल. ही स्पर्धा चौथी ते सातवी व आठवीच्या पुढे खुला गट अशी दोन गटात होणार आहे. भाग घेऊ इच्छिणाऱ्या सर्व कलाकारांना आपली नावे व रंगीत तालीम २८ एप्रिल रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत देता येतील. त्यानंतर येणाऱ्या नावांचा विचार केला जाणार नाही. इच्छुकांनी आपली नावे विद्यमान अध्यक्ष रो प्रकाश कामाजी (व्यंकटेश ज्वेलर्स, कानडी रोड ९८६०६ ५२४५४) सचिव आनंद तरकसबंद (सहशिक्षक ९४०४६ ९७४७५, ०८६-६८४-४७७४४), संस्थापक अध्यक्ष हनुमंत भोसले (९४२३७३३८८८), प्रोजेक्ट चेअरमन रो श्रीराम देशमुख (सहशिक्षक-९०७५७ ५४४४) यांचेकडे नोंदणी करावीत.

# सर्व जाती धर्माला बरोबर घेऊन जाणारा वारकरी सांप्रदाय आहे-महंत शिवाजी महाराज

# मराठवाड्याच्या महत्वाच्या प्रश्नासाठी पुढचा राजकिय प्रवास-माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर





बीड (सरकार):संपत्ती कमावण्यापेक्षा मुलांवर चांगले संस्कार करा, आजची मुले ही उद्याची राष्ट्राची संपत्ती आहे. मराठवाडा ही संतांची भुमी आहे. सर्व जाती धर्माला बरोबर घेऊन जाणारा वारकरी सांप्रदाय असल्याचे प्रतिपादन श्री क्षेत्र संस्थान नारायणगडाचे मठाधिपती महंत शिवाजी महाराज यांनी केले. तर जरूड ते सिरसाळा आणि शिरापूर फाटा ते सौताडा या दोन रस्त्यासाठी शासनाकडे पाठपुरावा केला असून तो मंजूर झाला आहे. त्याची निविदा प्रक्रिया होऊन हा रस्ता देखील पूर्ण होणार असून या रस्त्यामुळे दळणवळण सुविधा सुलभ होणार असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले.

माजी जि.प.सदस्य स्व.सौ. सुरेखाताई रविंद्र क्षीरसागर यांच्या तृतीय पुण्यस्मरणानिमित्त नवगण राजुरी येथे पंचदिनात्मक किर्तन महोत्सवाचे आयोजन आचार्य अमृताश्रम स्वामी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. या महोत्सवाची सांगता श्री क्षेत्र संस्थान नारायणगडाचे मठाधिपती ह.भ.प. प्रेममुर्ती महंत शिवाजी महाराज यांच्या काल्याच्या किर्तनाने झाली. यावेळी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, ह.भ.प. शिवाजी महाराज येवले, ह.भ.प. नारायण महाराज डिसले, मकरंद महाराज, रविंद्र क्षीरसागर, विलास बडगे, दिनकर कदम, नानासाहेब काकडे, सखाराम मस्के, डॉ.विठ्ठल क्षीरसागर, डॉ.योगेश क्षीरसागर, हेमंत क्षीरसागर,संपादक विजयराज बंब, अजित वरपे, बळीराम गवते, सुधाकर मिसाळ, सुभाष क्षीरसागर यांची प्रमुख उपस्थिती होती.

काल्याच्या किर्तनासाठी महंत शिवाजी महाराजांनी संत तुकाराम महाराजांचा अभंग घेतला. किर्तन सांगताना महाराज पुढे म्हणाले की, आई या शब्दात मोठी ताकत आहे, आई हा व्यापक शब्द आहे, लाख गुन्हे माफ करणारे न्यायालय म्हणजे आई आहे. निस्वार्थीपणे मुलांवर प्रेम करणारी आई आहे. चांगली मुले जन्मण्यासाठी आई-वडीलांची सुध्दा पुण्याई असावी लागते. शुध्द बीजापोटी फळे रसाळ गोमटी आई-वडीलांच्या पुण्याईने भगवंत रत्न जन्माला येतात. आई तुझे थोर उपकार असे कविने म्हटले आहे. आई माझी मायेचा सागर आहे. लाभाविना प्रेम करणारी आई आहे, स्व.रेखाताईंनी राम नामाचा जप केला, अनंत कोटी पुण्य घडलेले आहे. रेखाताईंनी उत्तम किर्ती केलेली आहे ज्यांनी उत्तम किर्ती केली त्यांचे असे सोहळे साजरे होतात. भक्तीच्या मंडपामध्ये काय करायचे आणि काय करायचे नाही हे शिकायचे आहे. जसे कर्म केले तसे फळ मिळते जसं पेराल तसं उगवतं भगवान स्वतःहून भक्ताकडे जातो अशी भक्ताची भक्ती असावी. आपल्यावर राज आल्यावर राज दिलच पाहिजे असे सांगून आत्महत्या करू नका आलेल्या संकटाला सामोरं गेलं पाहिजे स्त्री-भ्रूण हत्या करू नका. सर्वांनी एकत्र येऊन केलेली क्रिया याला काला म्हणतात असे त्यांनी सांगितले.

यावेळी पुढे बोलातना माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर म्हणाले की, भविष्याचा विचार करून मराठवाड्याच्या पाणी प्रश्नासाठी सातत्याने पाठपुरावा गरजेचा आहे, समुद्राला वाहून जाणारे पाणी हे जर आपल्याला उपलब्ध झाले तर पाण्याचा प्रश्न सुटू शकतो, पुढच्या पिढीसाठी आतापासून विचार करून प्रश्नांची सोडवणूक महत्वाची आहे, आगामी काळात अशाच प्रश्नासाठी पुढचा प्रवास करावा लागणार आहे. अध्यात्मातील राजुरीचे वैभव महंत अमृत महाराज आहेत. स्वामी तिन्ही जगाचा आई विना भिकारी स्व.काकू-नाना पासून पोकळी निर्माण झाली आहे. नियती कोणाला सोडत नाही. अध्यात्मिक क्षेत्रात स्व.रेखानी काम केले. रेखा आमच्या परिवारातील एक सदस्य होती. नवगण राजुरी आणि या भागात गणपतीचे आशिर्वाद आहेत जसे महाराष्ट्रात अष्टविनायक तसेच महात्म्य या परिसरात आहे. देवांचा दैत्यांवर विजय झाला असं त्या काळातल्या कथा आहेत. संघर्ष हा प्रत्येकाच्या जीवनात आहे भौतिक सुखासाठी माणूस झगडत असतो. या महिन्यात ठिकठिकाणी नारळी सप्ताह, वार्षिक सप्ताह होत आहेत त्यामुळे भक्तीचा महापूर आला आहे. संत तुकाराम महाराज, संत ज्ञानेश्वर महाराजांनी जाती तोडा समाज जोडा मन, माणूसकी जपा असे सांगून अध्यात्माचा संदेश दिला आहे असे त्यांनी सांगितले. यावेळी डॉ.अरूण भस्मे, रामदास हांगे, आसाराम औसरमल, सुनिल पांगारकर, ॲड.बालाप्रसाद करवा, संजय मचाले, अशोक रोमण, सुर्यकांत रायते, तानाजी आगळे, संजय कुलकर्णी, जीवन जोगदंड, प्रा.आबासाहेब हांगे यांच्यासह भाविक-भक्तांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# बडतर्फ रणजित कासले खोटारडा, त्याला निवडणूक ड्युटी नव्हतीच;निवडणूक आयोगाने केले स्पष्ट

## स्ट्राँग रूमची सुरक्षा ते मतमोजणी प्रक्रिया सीसीटिव्ही कॅमेऱ्यात बंदिस्त, केंद्रीय राखीव सुरक्षा बलासह तीन स्तरीय सुरक्षेत पडली पार

## कासलेचा आधार घेऊन आरोप करणारे तोंडघशी

## कासलेवर आयोगाच्या निर्देशानुसार गंभीर गुन्हे दाखल


बीड (सरकार): वादग्रस्त व सध्या सेवेतून बडतर्फ करण्यात आलेला पोलीस उपनिरीक्षक रणजित कासले याचे परळी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने व्हिडिओ द्वारे प्रसारित केलेले आरोप खोटारडे, जनतेची दिशाभूल करणारे तसेच निवडणूक आयोगावर शंका उपस्थित करणारे असून त्यात कोणतेही तथ्य नाही; रणजित कासले याला संपूर्ण निवडणूक प्रक्रियेत, स्ट्राँग रूमच्या सुरक्षित, ईव्हीएम मशीन सुरक्षा किंवा मतमोजणी प्रक्रिया यापैकी कुठेही परळी मतदारसंघात ड्युटी देण्यात आलेली नव्हती, तो बीड सायबर विभागात नियुक्त होता, असा स्वयंस्पष्ट खुलासा राज्य निवडणूक आयोगाने अधिकृतरित्या घोषित केला आहे.

निवडणूक प्रक्रियेत स्ट्राँग रूम मध्ये ईव्हीएम मशीन ठेवलेल्या ठिकाणी आपली ड्युटी होती व तिथे ईव्हीएम मशीन सोबत छेडछाड करता यावी, यासाठी आपल्याला दहा लाख रुपये देण्यात आल्याचा बोगस आरोप रणजित कासले याने सोशल मीडियावर व्हिडिओ प्रसारित करून केला होता. त्याची गंभीर दखल घेत निवडणूक आयोगाने बीड जिल्हा प्रशासनास अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले होते, त्यानंतर जिल्हाधिकारी बीड यांनी जिल्हा पोलिस अधीक्षक यांच्या मार्फत रणजित कासले बाबत अहवाल मागवला असता रणजित कासले हा त्या काळी बीड सायबर विभागात नियुक्त होता, त्याची ड्युटी परळी विधानसभा मतदारसंघात निवडणूक प्रक्रियेत कुठेही नेमण्यात आली नव्हती, असे अहवालात स्पष्ट नमूद करण्यात आले असल्याचे राज्य निवडणूक आयोगाने प्रसिध्दी पत्रकान्वये जाहीर केले आहे.

विधानसभा निवडणुकीत ईव्हीएम मशीन सील करताना सर्वपक्षीय उमेदवारांचे प्रतिनिधी तसेच निवडणूक निरीक्षक उपस्थित होते. ज्या ठिकाणी ईव्हीएम मशीन ठेवल्या ती जागा २४ तास सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या निगराणी खाली होती. त्या ठिकाणी तीन स्तरीय सुरक्षा तैनात करण्यात आली होती, ज्यामध्ये ईव्हीएम मशीनच्या सर्वात जवळ केंद्रीय पोलीस दलाचे अधिकारी कर्मचारी, इमारतीच्या परिघावर राज्य राखीव पोलीस दलाचे जवान, इमारतीच्या बाहेर जिल्हा पोलीस दलाचे कर्मचारी नियुक्त होते. तसेच ईव्हीएम मशीनच्या टेंपरिंग बाबत कोणतीही तक्रार कुठल्याही राजकीय पक्षाने केलेली नाही, रणजीत कासलेचा या प्रक्रियेशी कोणताही संबंध येत नाही.

बडतर्फ पोलीस उपनिरीक्षक रणजीत कासले याने केलेले आरोप निराधार तथ्यही दिशाभूल करणारे तसेच लोकशाहीच्या सर्वात महत्त्वाच्या असलेल्या निवडणूक प्रक्रियेवर नाहक संशय निर्माण करणारे व गंभीर असल्याचे देखील निवडणूक आयोगाने आपल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे. तसेच सदर निवडणूक प्रक्रिया ही पूर्णपणे पारदर्शक शांततेत आणि सुरक्षित पार पडल्याचे सुद्धा निवडणूक आयोगाने स्पष्टपणे नमूद केले आहे.

रणजीत कासले याने आपल्या खात्यावर आलेल्या दहा लाख रुपयांबाबत जी माहिती दिली होती, ही माहिती देखील खोटी असल्याचे उघड झाले असून सदर पैसे त्याने सुदर्शन काळे नामक अंबाजोगाई येथील एका व्यावसायिकाकडून उसने घेतले होते तसेच त्यातील अडीच लाख रुपये अजूनही परत केले नसल्याची तक्रार स्वतः सुदर्शन काळे यांनी बीड जिल्हा पोलीस दलाकडे केली आहे.



मात्र रणजीत कासले याने वेगवेगळ्या व्हिडिओच्या माध्यमातून केलेल्या आरोपांचा आधार घेत परळीच्या निवडणूक प्रक्रियेवर विविध आरोप करणारे राजकीय पुढारी मात्र चांगलेच तोंडघशी पडले आहेत. तर दुसरीकडे निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार परळी तहसीलच्या निवडणूक विभागाने रणजीत कासले यांच्या विरोधात परळी पोलिसात फिर्याद दिली असून रणजीत कासले याच्यावर विविध कलमांतर्गत गंभीर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

# बडतर्फ पोलीस उपनिरीक्षक रणजित कासलेचा खरा चेहरा उघड

## उसने म्हणून १० लाख रुपये खात्यावर पाठवलेले गुत्तेदार सुदर्शन काळे यांची पोलिसात तक्रार

## मुलाच्या फी भरण्यासाठी डिसेंबर महिन्यात घेतले होते पैसे, पुराव्यांसह काळेची तक्रार

## याच दहा लाखांवरून कासले करत होता भलतेच आरोप, सर्व आरोप खोटे निघाले

बीड (सरकार): बडतर्फ पोलीस उपनिरीक्षक रणजित कासले याचा आणखी एक कारनामा उघड झाला आहे. रणजित कासले स्वतःच्या खात्यावर दहा लाख रुपये धनंजय मुंडे यांच्या माणसांनी पाठवले असे सांगत होता, ते पैसे मुळात अंबाजोगाई येथील संत बाळू मामा कन्स्ट्रक्शन चे मालक सुदर्शन काळे यांनी पाठवले असल्याचे उघड झाले आहे.

याबाबत आता सुदर्शन काळे यांनीच स्वतः पोलिसात पैसे दिल्याच्या पुरावा सहित तक्रार दाखल केली आहे. रंजीत कासले हा पोलीस उपनिरीक्षक असताना मागील वर्षी अंबाजोगाई येथे कार्यरत होता, त्या काळात आपली त्याच्याशी ओळख झाली. डिसेंबर २०२४ मध्ये रणजीत कासले याने आपल्या लातूर येथे शिक्षण घेत असलेल्या मुलाच्या फीची अडचण असल्याचे सांगत दहा लाख रुपयांची उसनवारी ने मागणी केली.

एका कामाचे बिल आल्यानंतर मी त्यांना त्यांच्या क्सिस बँकेच्या वैयक्तिक खात्यावर ते दहा लाख रुपये पाठवले. विशेष म्हणजे त्यावेळी त्यांनी मला दुसऱ्या एका अनोळखी व्यक्तीच्या खात्यावर पैसे पाठवण्याचा आग्रह केला होता मात्र मी तसे न करता वैयक्तिक त्यांच्याच बँक खात्यावर पैसे पाठवले. त्यांनी लवकरच ते पैसे परत देतो, असे सांगितले होते. साधारण दीड ते दोन महिने उलटल्यानंतर मी त्यांना पैशाची परत मागणी केल्यावर त्यांनी टाळाटाळ केली. माझे पैसे मला गरजेच्या वेळी परत न दिल्यास मी त्यांच्या वरिष्ठांकडे तक्रार करणार असल्याचे सांगितले, किंवा त्यांनी गुजरात मधून मला काही रक्कम पाठवली. तसेच सायबर ठाण्यातील गिरी नामक कर्मचाऱ्यांच्या हाताने दोन लाख रुपये, असे तीन वेळा मिळून साडे सात लाख रुपये परत दिले आहेत. तर उर्वरित अडीच लाख रुपये परत मिळवून द्यावेत, अशी मागणीही काळे यांनी आपल्या तक्रारीत केली आहे. सुदर्शन काळे यांनी आपल्या तक्रारी सोबत कासले याला पैसे पाठवल्याचे पुरावे देखील जोडले आहेत. या तक्रारीची दखल घेऊन पोलीस प्रशासन कासले वर काय कारवाई करते याकडेही आता लक्ष लागले आहे.

# नगरपरिषद बीडचे मुख्याधिकारी व अधिकारी कर्मचारी यांच्यावर कार्यवाही केंव्हा होणार-गायसमुद्रे

बीड (सरकार): नगर परिषदेच्या मुख्याधिकारी श्रीमती नीता अंधारे व अधिकारी कर्मचारी यांच्याकडे कामानिमित्त अर्ज करू नये वारंवार पाठपुरावा करूनही प्रशासनाकडून कसलीही कारवाई होत नाही . त्यामुळे कंटाळून शासनाकडे नगरपरिषद महाराष्ट्र शासन ,जिल्हाधिकारी, सचिव नगर विकास मंत्रालय मुंबई व नगर परिषदे बीड केल्या परंतु यांच्याकडून सुद्धा कसलीही कारवाई होत नाही म्हणजे यांच्या मागे कोणीतरी मोठा बडा आका असावा त्यामुळे यांच्यावर कारवाई होत नाही असा आरोपे विजयकुमार गायसमुद्रे यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे केली आहे..

नगरपरिषदेकडे वेळोवेळी कामाविषयी अर्ज निवेदने देऊ नये नगरपरिषद प्रशासनाकडून कसलीही कारवाई होत नाही वारंवार कामासाठी चक्रा माराव्या लागतात अधिकारी कर्मचारी जागेवर नसतात अधिकारी कर्मचारी यांच्याशी संपर्क साधला असता कोणीही फोन उचलत नाहीत किंवा कामाबाबत सविस्तर उत्तर देत नाहीत या सर्व प्रशासनाच्या धोरणावरती कंटाळून नगरपरिषद अंतर्गत काय चालू आहे याविषयी आवाज उठवण्यासाठी खरी माहिती घेऊन न्यायालयात जाण्यासाठी माहितीच्या अधिकाराखाली अर्ज पुढील विषयानुसार

१)मार्च २०२१ पासून लोकशाहीर अण्णाभाऊ साठेदलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत महाराष्ट्र शासनाकडून नगरपरिषद बीडला किती निधी प्राप्त झाला व तो कोण कोणत्या भागामध्ये खर्च केला आहे आहे कोण कोणत्या भागात कामे सूर्य असून किती रुपयाचे कामे झाले आहेत याची सविस्तर यादी आजपर्यंत देण्यात यावी सदर निधी हा दलित प्रभात सोडून कोण कोणत्या ठिकाणी खर्च केला आहे . मार्च २०२२ ते डिसेंबर २०२४ पर्यंत बीड नगरपालिकेला महाराष्ट्र शासनाकडून विविध योजनेअंतर्गत किती निधी प्राप्त झाला आहे व तो कोण कोणत्या भागात कुठे कुठे खर्च झाला कोण कोणत्या भागात काम सुरू आहे याची यादी मार्च २०२२ ते डिसेंबर २०२४ पर्यंत बीड नगरपालिके अंतर्गत नियमित बांधकामाला दिलेली परवानगी व अनधिकृत बांधकामे सुरु असलेली प्रभाग निहाय यादी कार्यालयीन संचिकेसह देण्यात यावी मार्च २०२० ते डिसेंबर २०२४ पर्यंत भ्रष्टाचाराबाबत बीड नगरपालिकेच्या अधिकारी व कर्मचारी यांच्या विरोधात अँटी करप्शन कडे झालेल्या तक्रारीची व कार्यवाहीची माहितीसह यादी देण्यात यावी सन २०२२ ते डिसेंबर २०२४ पर्यंत नगरपरिषद बीड अंतर्गत चालू असलेल्या विविध कामाच्या व पूर्ण केलेल्या कामाचे कंत्राटदार कंत्राटदार कंपनी विकासक गुत्तेदार यांची नाव आणि ती यादी सन २०२१ २२ सन २०२२ २३ सन २०१८ २४ सन २०२४ २५ या आर्थिक वर्षातीलशासनाकडून व नगरपरिषद बीडच्या स्वतःच्या उत्पन्नातून प्राप्त निधी खर्च त्याचे विनयोग प्रमाणपत्र व लेखापरीक्षणअहवाल तसेच नगरपरिषद बीडच्या स्वतःच्या उत्पन्नातून चार वर्षात नगरपरिषदेच्या विविध कर आकारणी व वसुलीतून केलेल्या खर्चाचे विनीयोगपत्रबाकीसह लेखापरीक्षण अहवाल शासन निर्णय लोकपाल कायदा सन २०१६ नुसार सन २०२२ ते डिसेंबर २०२४ पर्यंतअधिकारी श्रेणी १ ते अधिकारी श्रेणीतील ३ पर्यंत यांच्या मत्ता व दायित्व प्रमाणपत्राची सत्यप्रत अधिकारी व कर्मचारी यांचे नातेवाईक आई-वडील भाऊ-बहीण मुलगा मुलगी भाऊजी भावजई पती-पत्नी व हितसंबंधातील नातेवाईकांची नावे नगरपरिषदेच्या विविध योजना अंतर्गत सुरू असलेल्या कामांमध्ये यांचा असलेला हस्तक्षेप नावे असले सुरू असलेले कामे कंत्राट कंपनी यांची माहिती नगर रचना विभाग अंतर्गत प्लॉटिंगच्या जमिनीची छ- ४४ भूखंडास दिलेल्या जमीन मालकांची नकाशासह यादीनगरपरिषद बीड अंतर्गत आरक्षित असलेल्या जमिनीच्या आरक्षण उठवण्यासंदर्भात शासनाकडे केलेले प्रस्ताव व शासनाने आरक्षण उठवलेल्या अशा जमिनीची यादी मालकासह देणे यावी माहिती मिळण्यासाठी अपील राज्य माहिती आयुक्त संभाजीनगर यांच्याकडे केले आहे शासनाने आता तरी बीड नगरपरिषदेच्या अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कठोर कारवाई करत त्यांना कोणाचे अभय आहे त्याची चौकशी करून माझ्यासह सर्वसामान्य माणसांचे काम नियमित वेळेवर व्हावी अशी मागणी प्रज्ञा विजयकुमार समुद्रे यांनी केली आहे जोपर्यंत न्याय मिळणार नाही तोपर्यंत याप्रकरणी वरिष्ठ कार्यालयाकडे कारवाईबाबत अर्ज केले जातील याविषयी न्यायालयात सुद्धा मागणी केली जाईल असे विजयकुमार गायसमुद्रे यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे केली आहे..

# जागतिक वसुंधरा दिनानिमित्त 'पर्यावरण वाचवा वसुंधरा सजवा' उपक्रमात सहभागी व्हा-पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे

## २२ एप्रिल,२०२५ ते १ मे, २०२५ या कालावधीत राज्यात विविध उपक्रम होणार

मुंबई (सरकार): पर्यावरणाचे संवर्धन व संरक्षण करण्यासाठी जागतिक वसुंधरा दिन म्हणजे दिनांक २२ एप्रिल, २०२५ ते महाराष्ट्र दिन म्हणजे १ मे, २०२५ या कालावधीत पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या वतीने राज्यात 'पर्यावरण वाचवा वसुंधरा सजवा' (पर्यावरण बचाओ वसुंधरा सजाओ) हा उपक्रम राबविण्यात येणार आहेत. या उपक्रमात सर्वांनी सहभागी व्हावे असे आवाहन पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग मंत्री पंकजा मुंडे यांनी केले आहे.



'पर्यावरण वाचवा वसुंधरा सजवा' या उपक्रमांतर्गत मंत्री पंकजा मुंडे या स्वतः २२ एप्रिल रोजी मुंबईतील पवई तलाव येथे स्वच्छता मोहिमेत सहभागी होणार आहेत. या उपक्रमात सर्व नागरिकांनी सहभागी व्हावे असे आवाहन श्रीमती मुंडे यांनी केले आहे.

नदी, नाले, तलाव स्वच्छता अभियानता सहभागी व्हावे

श्रीमती मुंडे म्हणाल्या, २२ एप्रिल हा जागतिक वसुंधरा दिवस आहे. या दिवशी आम्ही पर्यावरण ववातावरणीय बदल विभागामार्फत एक अत्यंत चांगली संकल्पना राबवत आहोत. ती संकल्पना म्हणजे जागतिक वसुंधरा दिवसाच्या पासून म्हणजे २२ एप्रिल ते १ मे महाराष्ट्र दिनापर्यंत विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. जसं आपण नवरात्र साजरा करतो, नऊ दिवस देवीच्या विविध रूपांची पूजा करतो, आराधना करतो, तसंच वसुंधरेची आराधना करण्यासाठी हे नऊ दिवस विविध कार्यक्रम आपण सर्वांनी राबवावेत. २२ एप्रिल रोजी या कार्यक्रमाची सुरुवात होणार आहे. मी स्वतः २२ एप्रिल रोजी पवई लेक मुंबई येथून स्वच्छतेची सुरुवात करणार आहे. दि. २२, २३ आणि २४ एप्रिल रोजी आपण सर्वांनी आपापल्या भागातील, आपल्या गावातील, आपल्या तालुक्यातील, आपल्या जिल्ह्यातील, आपल्या महानगरातील नगरातील पाण्याचे विविध स्त्रोत साफ करायचे आहेत. नद्या, नाले, तलाव ह्यांची स्वच्छता करायचे आहे. ग्रामपंचायतीच्या ग्रामसेवकापासून ते जिल्हा परिषद सीईओपर्यंत, तलाठ्यापासून ते जिल्हाधिकारीपर्यंत , ग्रामपंचायतच्या सरपंच, सदस्यापासून ते जिल्हा परिषद अध्यक्षापर्यंत आणि आमदार, खासदार, पालकमंत्री सर्वांनी यामध्ये सहभाग घ्यावा, असे आवाहन श्रीमती मुंडे यांनी केले आहे.याबरोबर शासकीय यंत्रणासमवेत वेगवेगळ्या संघटना, स्वयंसेवी संस्था यांनी देखील याच्य ामध्ये सहभाग घ्यावा. नदी - नाले, सरोवर स्वच्छ करणाऱ्या लोकप्रतिनिधीचे अधिकाऱ्याचे आणि सामाजिक संस्थेचे मूल्यमापन करून त्यांचा सुद्धा जिल्हा पातळीवर पालकमंत्र्यांच्या हस्ते ध्वजारोहणानंतर सन्मान होईल आणि राज्यभरातून अशा अत्यंत चांगल्या काम केलेल्या लोकांचा राज्यपातळीवरही सन्मान होईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

हे पत्रक मालक मुद्रक व प्रकाशक, संपादक आदोडे साहस पंढरीनाथ यांनी वरद प्रिंटर्स,जालना रोड,सहयोगनगर,बीड-४३११२२ येथे छापून कार्यालय सायं.दैनिक बीड सरकार संत नामदेवनगर, धानोरा रोड,बीड-४३११२२ येथे प्रकाशित केले आहे. मोबाईल नं.९८५०७९४७७९
(या अंकामधील छापलेल्या मजकुराशी संपादक/प्रकाशक सहमत असतीलच असे नाही- वाद बीड न्यायालया अंतर्गत)

Daily Evening Beed Sarkar Owner,Printer,Publisher and Editor Adode Sahas Pandhrinath has Varad Printers,Jalna Road Sahayog Nagar,Beed-431122 (Mahrashtra) and Published In Office Evening Daily Beed Sarkar,Sant Namdevnagar, Dhanora Road, Beed-431122. Mobile No. 9850794779
(The editors / publishers do not necessarily agree with the printed text in this issue - under the Beed Court of Appeals)